॥ बुगडि माझी सांडली गं ॥

गायिकाः आशा भोसले
गीतः ग. दि. माडगूळकर
संगीतः राम कदम

हाय, बुगडि माझी सांडली गंः जाता सातार्याला
चुगली नका सांगूं गं, कोणी माझ्या म्हातार्याला ॥ धृ. ॥

कोरसः चुगली नका सांगू गं, कोणी हिच्या म्हातार्याला ।

माझ्या शेजारी तरुण राहतो
टकमक टकमक मला तो पाहतो।
कधीं खुणेनें जवळ बाहतो,
कधीं नहीं तें भुललें गं बाई,
त्याच्या इशार्याला, त्याच्या इशार्याला ॥ १ ॥

आज अचानक घरीं तो आला
पैरण फेटा न् पाठीस शेमला।
फार गोड तो मजसी गमला,
दिला बसाया पाट मी बाई,
त्याला शेजार्याला, माझ्या शेजार्याला ॥ २ ॥

घरांत नव्हते तेव्हां बाबा
माझा मझवर कुठला ताबा।
त्याचि धिटाई तोबा तोबा,
वितळुं लागे गं लोणी बाई,
बघता निखार्याला, बघता निखार्याला ॥ ३ ॥

येण्या आधी बाबा परतून,
पोचणार मी घरांत जाऊन।
मग पुसतील काना पाहून,
काय तेव्हां सांगूं मी ग बाई,
त्याला बिचार्याला, त्याला बिचार्याला ॥ ४ ॥